वाचले- 1. म.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे कडील आदेश क्र.2017/ब/कक्ष.2/काबि/543/2017 दि.23/08/2017
2. अर्जदार क्रियेशन एंटरप्रायजेस प्रा.लि.करीता संचालक श्री.सिध्दार्थ किशोर वाणी यांचा अर्ज दि.07/09/2017
3. म.नगर रचनाकार नंदुरबार यांचेकडील नकाशा मंजुरीबाबत चे पत्र क्रमांक जा.क्र.संसनर/ नंदु/बांध.पर/मौजे खामगांव /ता.जि.नंदुरबार/ स.नं.80/974 दि.29/08/2017

क्रमांक/2017/गांवठाण/बां.पर/कावि- 61
उपविभागीय अधिकारी नंदुरबार यांचे ,
कार्यालय नंदुरबार भाग
नंदुरबार दि. 02/11/2017

आदेश-

अर्जदार क्रियेशन एंटरप्रायजेस प्रा.लि.करीता संचालक श्री.सिध्दार्थ किशोर वाणी रा.नंदुरबार यांनी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने इकडील कार्यालयास प्राप्त उपरोक्त वाचले क्र.3 म.नगर रचनाकार नंदुरबार यांचेकडील पत्रात नमुद शिफारशीवरून मौजे खांमगाव ता.नंदुरबार स.नं.80 मधील भुखंड क्रमांक 56,57,58,59,60,64,65,66,67,68,73,74,75,76,77, 78,79,81,82,83,85,63,167 या रहिवास प्रयोजनार्थ बिनशेती भुखंडांवर सोबत जोडलेल्या भुखंडनिहाय बांधकाम अराखड्यानुसार खालील अटी व शर्तींना अधिन राहून बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

1) मौजे खांमगाव ता.जि. नंदुरबार शिवारातील स.नं.80 या जमीनीस बिनशेती परवानगी कामी मंजूरी मिळालेल्या भूमी अभिन्यासास नगर रचनाकार नंदुरबार यांचे पत्र क्रमांक 499 दि.17/04/2015 अन्वये मंजुरीची शिफारस केलेली आहे सदर पत्रातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
2) प्रस्तूत बांधकाम नकाशास नगर रचनाकार नंदुरबार यांचेकडील नकाशा मंजुरीबाबत चे पत्र क्रमांक जा.क्र.संसनर/ नंदु/बांध.पर/मौजे खांमगाव /ता.जि.नंदुरबार/ स.नं.80/974 दि.29/08/2017 मधील शिफारशीच्या अटी शर्ती व दिलेल्या सुधारणा बंधनकारक राहतील.
3) बांधकाम नकाशात दर्शविलेली भुखंडाची मापे जागावर जुळली पाहिजे तसेच समोरून (रस्त्यापासून) बाजूने व मागील बाजूने (पाठीमागून) सोडवयाचे समास अंतर सदर नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागेवर सोडली पाहिजे.
4) जागेवर जोत्यापर्यंतचे (Plinth Level) पर्यंत बांधकाम झाल्यावर सदरहू बांधकाम हे मंजूर केलेल्या बांधकाम नकाशा प्रमाणे असल्याबाबत खात्री करून घेतल्यावरच अर्जदार यांनी पुढील बांधकाम करावे.
5) सांडपाण्याचा निचरा योग्य रितीने होणेची व्यवस्था करणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
6) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सदरहु बांधकामाचा प्रस्तावित वापर सुरू होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
7) सदरहु प्रत्येक भुखंडात कमीत कमी चार झाडे लावून ती जोपासली पाहिजेत.
8) छतावर पडणारे पावसाचे पाणी जमीनीत मुरण्याची अथवा साठविण्याची (Rain Water Harvesting) व्यवस्था करणे आवश्यक राहील.
9) प्रस्तावीत बांधकाम हे भारतीय मानकब्युरोने विहीत केलेल्या तरतुदीनुसार सक्षम स्थापत्य अभियंत्याचे देखरेखी खाली भुकंपरोधक बांधकाम अर्जदार यांनी करणे आवश्यक आहे.
10) विषयांकित जागेच्या चतु:सिमेबाबत, क्षेत्राबाबत अथवा कोणत्याही वाद उत्पन्न झाल्यास त्यांची बांधकाम परवानगी सुधारीत करून घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
11) सदर जागेत बांधकाम नकाशांना मंजुरी देणेपुर्वी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम (सुधारणा अधिनियम) चे कलम 124 ब अंतर्गत दुसरी अनुसूची भाग-1 व भाग-2 या नुसार विकास शुल्क रुपये 16820/- इतकी रक्कम चलन क्रमांक 4757947 दि.28/08/2017 रोजी संबंधीत लेखाशिर्षामध्ये म.नगर रचनाकार नंदुरबार यांचे कार्यालयात जमा केलेले आहे. प्रकरणी भविष्यात सदर रकमेबाबत काही तफावत निघाल्यास, नियमानुसार वाढीव रक्कम भरणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.
12) महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र:बीसीए-2009/प्र.क्र. 108/कामगार 7-अ मंत्रालय मुंबई दि.17 जुन 2010 मधील तरतुदी नुसार अर्जदार यांचे कडून प्रस्तावीत बांधकाम मुल्याच्या 1% रक्कम रु.243200/-/- मात्र बँक ऑफ इंडीया शाखा नंदुरबार येथे दि. 27/10/2017 रोजी भरणा केलेली आहे. भविष्यात सदर रकमांबाबत काही तफावत निघाल्यास, नियमानुसार वाढीव रक्कम भरणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.
13) प्रस्तूत बांधकाम परवानगी आदेश मिळाल्या पासून एक वर्ष वैध राहील. व मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढ घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.
14) **वरील कोणत्याही अटी/शर्तीचा किंवा परवानगी पेक्षा जास्तीचे अथवा मंजूर नकाशा व्यतीरीक्त बांधकाम केल्यास प्रसतूतची परवानगी आपोआपच रद्द होईल.**
15) **बांधकाम परवानगी दिलेल्या जागेच्या मालकी हक्काबाबत कोणताही वाद उदभवल्यास ही परवानगी आपोआपच रद्द होईल.**

सहायक जिल्हाधिकारी,
नंदुरबार भाग नंदुरबार

प्रति,-क्रियेशन एंटरप्रायजेस प्रा.लि.करीता संचालक श्री.सिध्दार्थ किशोर वाणी

प्रत- ग्रामसेवक खांमगाव
2 /- सदर बांधकाम परवानगी पत्रातील अटी शर्तीचे अर्जदार पुर्तता करतात किंवा नाही याकडे लक्ष दयावे. तसे आढळुन आल्यास संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करावी.

सहायक जिल्हाधिकारी,
नंदुरबार भाग नंदुरबार